IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# 'पिढीपेस्तर प्यादेमात' काव्यसंग्रहामधील कृषिसंस्कृती

**डॉ. नामदेव विठ्ठल शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय , माढा, जि. सोलापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

***Keywords:***
ग्रामीण काव्यसंग्रह,
कृषिसंस्कृती,
ग्रामसंस्कृती,
साठोत्तरी साहित्य प्रवाह,

**ABSTRACT**

संतोष पद्माकर पवार यांचा 'पिढीपेस्तर प्यादेमात' (२००८) हा ग्रामीण कवितासंग्रह आहे. यामध्ये त्यांनी शेती, शेतकरी, त्याची संस्कृती यांच्या स्थितीचे वर्णन केले आहे. या कृषिवलांच्या संस्कृतीमधील गावखुरांच्या रीतीची, मजुरांच्या घामाची, बाईपणाच्या मातीची आणि कुणब्यांच्या जीवाची झडती घेण्याचे काम संतोष पवारांनी 'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहात केली आहे. पिढीपेस्तर प्यादेमात म्हणजे प्रत्येक पिढीनंतर येणाऱ्या पिढीच्या वाट्याला नशिबाने आलेला भोगवटा, कष्ट, संघर्ष होय. वंशपरंपरेतून ही प्यादेमात चालत येते. याविषयी प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "आपल्या ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांची, शेतमजुरांची, तमाम स्त्रीवर्गाची, हिंदू-मुस्लीम आदि सर्व धर्मीय रयतेची, उरल्यासुरल्या अलुत्या बलुत्यांची, कारूनारूंची पण एवढेच नाही. ग्रामीण परिसरातील निसर्ग, पशुपक्षी, हवापाणी यांच्याही नशिबी हीच प्यादेमात आहे." अशी ही प्यादेमात कृषिजन संस्कृतीच्या वाट्याला आली. या काव्यसंग्रहात कुणबी, मजूर, गाय व स्त्री यांच्या आयुष्याचा ताळेबंद मांडला आहे. झडती एक या विभागामध्ये बाईचे आयुष्य, विविध परंपरा, रूढी, स्त्रीचे जीवन, कष्ट, संघर्ष, त्याग, अभावग्रस्तता यांचे चित्रण केले आहे. 'माती' या कवितेत स्त्रीचा त्याग दिसतो. जन्मभर राबून स्त्रीला दमडीची पत मिळत नाही. तिच्या पोटी जन्म घेऊनही तिला पुरूषांनी ठोकारले. 'सासराला निघताना' या कवितेत आई व मुलगी यांचा संवाद येतो. सासरचे कष्ट, कुटुंबाची जबाबदारी, करावा लागणारा त्याग याविषयी ही आई आपल्या मुलीला ज्ञानाचे धडे देते. सासरी नांदताना कोणताही जुलूम सहन करू नये. तशी परिस्थिती उद्भवली तर त्या परिस्थितीशी झुंज यायला तयार असावे, अशी शिकवण ही आई देते आहे. अन्यायग्रस्त स्त्रीचे वर्णन 'बोल सये' या कवितेत येते. तर 'बाप-सात पोरींचा' या कवितेत सात मुलींच्या बापाची चिंता व्यक्त होते. मुलींच्या लझानासाठी करावा लागणारा खर्च, त्यातील रीतभात यामुळे हा बाप चिंतातूर झाला. सात मुलींसाठी दादले मिळविण्याची त्याला चिंता आहे. अस्वस्थ मनःस्थितीमध्ये तो जगतो. स्त्री जीवनाचे वास्तवचित्र येथे पहायला मिळते. 'भांडण' या कवितेमधून ग्रामसंस्कृतीमधील कुटुंबातील कलह चित्रित केला आहे. सासू व सून या दोन्ही स्त्रियां असूनही एकमेकींशी नेहमी भांडतात. यातून कौटुंबिक कलह वाढतो. बाप मुलाला मारतो. तर मुलगा बायकोला यामुळे सासूला आनंद झाला आहे. एकूणच या कौटुंबिक भांडणांमुळे कुटुंबाचे स्वास्थ्य नष्ट झाले.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shinde, N. V. (2025). **'पिढीपेस्तर प्यादेमात' काव्यसंग्रहामधील कृषिसंस्कृती.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 774–780.

**१. गोषवारा/प्रास्ताविक:**

संतोष पद्माकर पवार यांचा 'पिढीपेस्तर प्यादेमात' (२००८) हा ग्रामीण कवितासंग्रह आहे. यामध्ये त्यांनी शेती, शेतकरी, त्याची संस्कृती यांच्या स्थितीचे वर्णन केले आहे. या कृषिवलांच्या संस्कृतीमधील गावखुरांच्या रीतीची, मजुरांच्या घामाची, बाईपणाच्या मातीची आणि कुणब्यांच्या जीवाची झडती घेण्याचे काम संतोष पवारांनी 'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहात केली आहे. पिढीपेस्तर प्यादेमात म्हणजे प्रत्येक पिढीनंतर येणाऱ्या पिढीच्या वाट्याला नशिबाने आलेला भोगवटा, कष्ट, संघर्ष होय. वंशपरंपरेतून ही प्यादेमात चालत येते. याविषयी प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "आपल्या ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांची, शेतमजुरांची, तमाम स्त्रीवर्गाची, हिंदू-मुस्लीम आदि सर्व धर्मीय रयतेची, उरल्यासरुल्या अलुत्या बलुत्यांची, कारूनारूंची पण एवढेच नाही. ग्रामीण परिसरातील निसर्ग, पशुपक्षी, हवापाणी यांच्याही नशिबी हीच प्यादेमात आहे." अशी ही प्यादेमात कृषिजन संस्कृतीच्या वाट्याला आली. या काव्यसंग्रहात कुणबी, मजूर, गाय व स्त्री यांच्या आयुष्याचा ताळेबंद मांडला आहे. झडती एक या विभागामध्ये बाईचे आयुष्य, विविध परंपरा, रूढी, स्त्रीचे जीवन, कष्ट, संघर्ष, त्याग, अभावग्रस्तता यांचे चित्रण केले आहे. 'माती' या कवितेत स्त्रीचा त्याग दिसतो. जन्मभर राबून स्त्रीला दमडीची पत मिळत नाही. तिच्या पोटी जन्म घेऊनही तिला पुरूषांनी ठोकारले. 'सासराला निघताना' या कवितेत आई व मुलगी यांचा संवाद येतो. सासरचे कष्ट, कुटुंबाची जबाबदारी, करावा लागणारा त्याग याविषयी ही आई आपल्या मुलीला ज्ञानाचे धडे देते. सासरी नांदताना कोणताही जुलूम सहन करू नये. तशी परिस्थिती उद्भवली तर त्या परिस्थितीशी झुंज यायला तयार असावे, अशी शिकवण ही आई देते आहे. अन्यायग्रस्त स्त्रीचे वर्णन 'बोल सये' या कवितेत येते. तर 'बाप-सात पोरींचा' या कवितेत सात मुलींच्या बापाची चिंता व्यक्त होते. मुलींच्या लझानासाठी करावा लागणारा खर्च, त्यातील रीतभात यामुळे हा बाप चिंतातूर झाला. सात मुलींसाठी दादले मिळविण्याची त्याला चिंता आहे. अस्वस्थ मनःस्थितीमध्ये तो जगतो. स्त्री जीवनाचे वास्तवचित्र येथे पहायला मिळते. 'भांडण' या कवितेमधून ग्रामसंस्कृतीमधील कुटुंबातील कलह चित्रित केला आहे. सासू व सून या दोन्ही स्त्रियां असूनही एकमेकींशी नेहमी भांडतात. यातून कौटुंबिक कलह वाढतो. बाप मुलाला मारतो. तर मुलगा बायकोला यामुळे सासूला आनंद झाला आहे. एकूणच या कौटुंबिक भांडणांमुळे कुटुंबाचे स्वास्थ्य नष्ट झाले.

**२. बीजशब्द:**

ग्रामीण काव्यसंग्रह, कृषिसंस्कृती, ग्रामसंस्कृती, साठोत्तरी साहित्य प्रवाह, पिढीपेस्तर प्यादेमात या संतोष पवारांच्या काव्यसंग्रहाचा आशय, ग्रामीण कविता इ.

**३. उद्दिष्टे:**

ग्रामीण कवितेची वैशिष्ट्ये व स्वरूप अवलोकन करणे. ग्रामीण कवितेचे वेगळेपण सिद्ध करणे. कवी संतोष पवार यांच्या 'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहातील ग्रामसंस्कृतीचे चित्रण करणे. कृषिसंस्कृती मधील शेतकऱ्यांचे जीवन, सामाजिक स्तर, सांस्कृतिक व आर्थिक जीवन समजून घेणे. कृषिसंस्कृती मधील विकासाच्या सद्य:स्थितीचे अवलोकन करणे व त्यातील समस्या मांडून उपाय योजनांचा विचार करणे.

**४. 'पिढीपेस्तर प्यादेमात' काव्यसंग्रहामधील कृषिसंस्कृती:**

कवी संतोष पवारांनी कृषिवलांच्या संस्कृतीमधील गावखुरांच्या रीतीची, मजुरांच्या घामाची, बाईपणाच्या मातीची आणि कुणब्यांच्या जीवाची झडती घेण्याचे 'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहात केले आहे. 'पहिलटकरणी ग...' या कवितेत स्त्री सृजनशक्तीचा गौरव व्यक्त होतो. पहिलटकरण स्त्री ही अनुभवाने मोठी आहे. गावामध्ये बाळंतपणाची वर्दी आली की सर्वांसाठी धावून जाणारी ही पहिलटकरीण आहे. स्त्रीचे हे सृजन जगामध्ये बाईपणाचा मान वाढविणारे आहे, अशी भावना व्यक्त होते. 'बाई

रोजच्या घागरी' या कवितेत स्त्री जीवन व्यतीत करताना खंबीरपणे जगण्याचा आशावाद व्यक्त केला. सासू, सासरा, नणंद, नवरा, दीर या सर्वांच्या मर्जीप्रमाणे त्या सुनेला वागावे लागते. त्यातूनही भांडण, मारामारी होत असते. वाट्याला येणारे कष्ट, त्याग, संघर्ष, अन्याय हे सर्व काही पचवून जीवन जगायला शिकले पाहिजे. आत्महत्या करून स्त्री जन्माचे प्रश्न सुटत नाहीत हे येथे स्पष्ट केले. 'सर घातला गळ्यात' यामध्ये पुरूषप्रधान संस्कृतीचे स्त्री जीवनासंदर्भातील राजकारणाचे चित्र दिसते. स्त्रीच्या प्रत्येक दागिण्यांमध्ये पुरूषी वर्चस्वाची प्रचिती दिसते. गुंजभर सोन्यासाठी बाई ही जन्माची गहाण ठरते. संसाराचे रखवाले शेवटी तिच्याच जीवावर उठतात. 'साऱ्या जिंदगीचा राडा' या कवितेत स्त्रीला जीवन जगताना येणाऱ्या अडचणी मांडल्या आहेत. एखादी विधवा स्त्री संघर्षमय आयुष्य जगते. तिच्याकडे समाज वाईट दृष्टिकोनातून पाहतो. समाजामध्ये तिला कोणताही मानसन्मान मिळत नाही. इतर स्त्रियांही तिला आपल्यामध्ये सामावून घेत नाहीत. दुनियेच्या डोळ्यांमधील वासनेचा अंश अशा स्त्रीकडे बघून वाढतो. त्यामुळे विधवा स्त्रीच्या आयुष्यात संघर्ष, भीती, अन्याय-अत्याचार यांची तीव्रता वाढली आहे. 'धुळवड', 'बाईपणाच्या जातीला', 'माय होतीच तसली' या कवितांमधून स्त्री जीवनामधील कष्टप्रद जीवन, स्त्रीचे चारित्र्य यांच्याविषयीचे चित्रण येते. स्त्रीला आयुष्यामध्ये स्वतःची नैतिकता, चारित्र्य खूप काळजीपूर्वक जपावे लागते. समाजामध्ये योनीसुचितेच्या कल्पनेला महत्त्व दिले. यामुळे स्त्रीने एका विशिष्ट चौकटीत स्वजीवन बसवण्याची सक्ती झाली. समाज स्त्रीच्या नैतिकतेचा भंग करण्याचा सतत प्रयत्नात असतो. त्यामुळे आपल्या जन्माला डाग लागू नये, यासाठी स्त्रीला नेहमी झगडावे लागते. तिचेच दूध पिऊन पुरूषरूपी साप तयार होतात. तिच्या जन्म मरणाची नोंद कोणत्याच दप्तरी नसते. अभावग्रस्त स्थितीमध्येही स्वतःला संभाळत ती कुटुंबाला संभाळते. कुटुंबाच्या भाकरीची चिंता वाहते. कुटुंब उभे करण्याचे काम ती करते. तरीही तिला अपेक्षित जगणं लाभत नाही. 'तू सृष्टीची सम्राज्ञी' या कवितेत स्त्री गौरव दिसतो. हे स्त्री महात्म्य-

*"तू साऱ्या जगाला प्रसवले/ठेवलास वाहत झरा/अखंड जीवनाचे स्त्रोत फुलवले दर युगाच्या वळणावर तुझीच होती/ सत्ता आणि तू होतीस मालकीण/ तू हलवत होतीस गुणसूत्र आणि पिढ्याच्या-पिढ्या स्वतःचे आतडे उपसून..." (पिढीपेस्तर प्यादेमात, पृ.क्र. ५८)*

असे आहे. तिने जग निर्मिले. ती मालकीण आहे. सृष्टीची भूमिकाही ती ठरवते. कैवल्याचे झाड बनून तिने सर्व युगे पेलली. संस्कृतीची विकासक ठरली. जगाची भाकरी तयार केली. शेतीचा शोध लावला. स्वतःकडे कष्ट, त्याग घेऊन युगाला सुखाचा क्षण उपभोगायला दिला. तिचा इतिहासही समृद्ध आहे. तिने राक्षसांमध्येही भूतदया भरली आहे. शब्दसृष्टीची जननी बनून मातृत्वाचा वारसा जपला. ती नायक ठरली. तिने संस्कृती घडविली. सृजनाची शक्ती बनून आपुलकीची नाती घडविली. तिच्या सत्तेला परिसीमाच नाही. असे समृद्ध जीवन घडविणारी स्त्री पुरूषसत्ताक पद्धतीमध्ये भरडून गेली. तिला साखळदंडात बांधून पोरं तयार करण्याचे एक मशीन बनवले. तिच्याभोवती अनिष्ट रूढी, प्रथा, समजुती यांचे विळखे घातले. विटाळामध्ये डांबून तिच्या सृजनाची अवहेलना केली. तिचे जगणे निसत्व बनवले. सम्राज्ञी असूनही कुत्र्यापुढे टाकलेल्या तुकड्यासारखे तिचे पतन झाले. शोषणाची खाण झाली. एकेकाळी समृद्ध आयुष्य जगणाऱ्या स्त्रीच्या आयुष्याची वास्तवामधील जीवनाची करूण कहाणी यामध्ये आली आहे. कृषिवलांच्या संस्कृतीमध्ये स्त्रीच्या वाट्याला येणारे भोग, संघर्ष, कष्ट यांचे चित्रण यामध्ये दिसते.

कृषिजन संस्कृतीमधील मजुरांच्या घामाची झडती दुसऱ्या विभागामध्ये या काव्यसंग्रहात आली आहे. उपेक्षित जीवन जगणारा, कष्टणारा मजूर या कतियेत येतो. मजुरी करणारा मजूर नेहमी भिकाऱ्यासारखा भासतो. तो घाम गाळतो व दुसरेच मालामाल होतात. मजुराचे संपूर्ण कुटुंब कष्टत असते. त्याच्या घामाची किंमत कोणी करत नाही. भाकरीसाठी संबंध जिंदगी त्याला जाळावी लागते. संसाराचा पांगुळगाडा ओढीत तो गावगाडाही रचत असतो. रावणाऱ्याचे हात नेहमी रिकामेच. मजुराच्या कष्टाची किंमत शिल्लक ठेवली नाही. त्याच्याबद्दल काळजाचा खोपा कोठेही नसतो. दारिद्र्यात सोबतीला अथांब कष्ट असते. असा मजूर 'खोपा', 'असा अंबाडीचा दोर', 'मजुरी' या कवितेत दिसतो. 'आम्हाला वाली कुणीच नाय' या कवितेत मजुरांच्या वास्तवस्थितीचा आढावा

घेतला आहे. सर्व कुटुंब दारिद्रयाच्या खाईत. इभ्रत कोणी ठेवत नाही. सगळा जन्मच गुलामगिरीमध्ये जातो. हात राबतात पण त्यांची भेट तोंडाशी पडत नाही. मजुरांच्या कष्टावर भांडवलदार वर्गच अधिकच श्रीमंत बनत गेला. गावं ओस पडली. शहरे भरू लागली. मजुरांच्या कष्टाची लूट होऊ लागली. सुधारणांच्या नावाखाली कष्टाचे मूल्य कमी केले. दुसऱ्या बाजूला निसर्गाने रूप बदलले. दुष्काळ, गारपीट यासारख्या संकटांमुळे मजुरांचे जीवन अधिकच अनिश्चित स्वरूपाचे बनले. मजुरांच्या हाताला यश ठेवले नाही. जे पिकतं तेही हिसकावून घेण्याची वृत्ती बळावली. त्यामुळे मजुरांना या सथः स्थितीमध्ये कोणीही बाली उरला नसल्याची भावना व्यक्त होते. तर 'बैल' कवितेत मजूर व बैल यांचे जीवनस्तर एकाच पातळीवर आल्याचे दिसते. ते वास्तव म्हणून आपणालाही मान्य करावे लागते. बैलांचे व मजुरांचेच हे मनोगत. आयुष्यभर तोंडाला मुसक्या बांधून कष्टत राहणे. शेत पिकविण्यासाठी झिजत राहणे. जगाला धान्य देणे. अतिकष्टाने शरीराला भयंकर बास होतो. अशा अवस्थेतही मालकाने दिले ते खाणे ही स्थिती. शेवटी शरीरातील शक्ती कमी झाली की, कसायाच्या दावणीला बैलांचे स्थान उरते. मृत्यूनंतर पायाचे जोडे होऊन ही ते मदतीला येतात. बैलांच्या जीवनाची करूण कहाणी, कष्टप्रद कहाणी यामध्ये येते. 'पत्थर', 'हात' या कवितेतही मजुरांची कौटुंबिक स्थिती, त्यांचे प्रश्न मांडले आहेत. आयुष्यभर राबून शेवटी मुक्यानेच मरावे लागते. कुटुंब नियोजन आणि निरक्षरता यामुळे घरामध्ये खाणारी तोंडे सात आणि राबणारा हात एकच असतो. हात उसण्यामध्येच सर्व कष्ट वाया जातो. कर्जाचे प्रमाण व सुगी यामधील व्यस्तप्रमाणामुळे मजुरांच्या वाट्याला समृद्धी प्राप्त होत नाही. काहींनी शेत विकले. गाव सोडले, पण आयुष्यात फारसा बदल नाही. नेहमी हातावरचं पोट राहिलं. 'पिवळे दात' या कतिवेमध्ये शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिसतो. शेती हा फायद्याचा व्यवसाय राहिला नाही. सरकारी योजना गोरगरिबांसाठी नाहीत. अशी अवस्था, भावना आजच्या कुणबी मजुराची आहे. तर 'मालक' या कवितेत मजुरांच्या शोषणव्यवस्थेचे गणित मांडले आहे. मजुरांचे जीवन मालकांनी गुलाम बनवले. त्याच्या मजुरीवर ते आर्थिकदृष्ट्या संपन्न होतात. पण मजूर मात्र गरिवच राहतो. मालक स्वतःचे जीवन उजळून घेतात. उचल, कपडालत्ता, धान्य देऊन मजुराला उपकाराच्या ओझ्याखाली दाबतात. मजुराच्या मालकीणीवर रात्र गुजारतात. हेच आयुष्य पिढ्यान्पिढ्या मजूर कुटुंबाच्या वाट्याला येते. मजुरांच्या कुटुंबांची वाताहत, त्यांच्यावरील अत्याचार, कष्टाचे मूल्य न मिळणे, सततचे कष्ट या गोष्टीच मजुरांच्या जीवनसाथी असल्याचे यामधून दिसते.

संतोष पवारांनी तिसऱ्या विभागामध्ये गावखुरीच्या रीतीची झडती घेतली. गाव, गावगाड्याची रचना, अलुतेदार-बलुतेदार, कारू नारू, चावडी, गावसंस्कृती, गावधर्म, रूढी-परंपरा अशा गावाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी सजगतेने भाष्य करणारी संतोष पवारांची कविता आहे. खेड्याचे स्मृतिशेष पाहून मनामध्ये कृषिवलांच्या संस्कृतीविषयीच्या -हासपर्वाविषयीची सांशकता वाढते. 'गाव, खेडी, चावडी, माणसं, संस्कृती, भाषा या सर्वच व्यवस्था लोप पावतील. काही वर्षात गावखेडी आणि गावशेती खरोखरच होती काय?' हे डॉ. किशोर सानपांचे मत पटू लागते. पूर्वीसारखी वैभव संपन्नता गावामध्ये उरली नाही. शहाणपण संपले. गावोगावी तकलादू बुवा-बाबांचे स्तोम माजले. देव-धर्म यांचाही बाजार भरू लागला. निराधार व्यक्ती जसा डोल (सरकारकडून महिनाअखेर मिळणारी आर्थिक मदत) खात बसतात, तशी गावस्थिती झाली. गावपण संपले. गायीचे हंबरणे, आडावरच्या रहाटाचा आवाज यामधील शुष्कता वाढली. भाऊबंदकीने जोर धरला. जत्रा यात्रा यामधून पानापमानाचा खेळ रंगला. 'ते' या कवितेत गावाची जैसे थे स्थिती दिसते. पारावर निराधार गप्पा मारणाऱ्यांची टोळी वाढली. उद्योगधंदा न करणाऱ्यांची संख्या गावभर पसरली, त्यामुळे गाव जिथल्या तिथेच राहिला. पिढ्यान्पिढ्याची घुसमट गावत आहे. 'आड' या कवितेत गावाच्या हासपर्वाची कहाणी येते. भाकड गाईसारख्या गावाच्या वैभावाची स्थिती झाली. माणसाची नियती बदलली. रात्री भजनामध्ये बसून मनामध्ये येणाऱ्या चांगल्या कल्पना ह्या त्या रात्रीपुरत्याच उरल्या. अनैतिकतेचा नित्यनियमाने पाढा वाचणाऱ्यांची गर्दी वाढली. 'खेळ' या कवितेतही गावामधील वाद, तंटे यांचा संदर्भ येतो. जागतिकीकरणामुळे मानवाची जीवनमूल्येच बदलून गेली. चंगळवाद हाच धर्म झाला. कोर्ट-कचेऱ्या, राडेबाजी, बाद, भांडण, तंटे, खून यामध्येच गाव रंगून गेला. याविषयी एकनाथ पगार वास्तव निरीक्षण

नोंदविताना म्हणतात, "खेड्यातला जीवनव्यवहार बिनसला आहे. रोगट मनोवृत्तीचे म्होरके गावाचे नियंत्रण करीत आहेत. 'गोरोबा काकांची एक नवी आख्यायिका' या कवितेत परंपरागत व्यवसाय नष्ट होऊन बेरोजगारी वाढल्याचे चित्रण येते. शिवाय परंपरागत व्यवसयामध्ये जन्मभर कष्ट करून प्रस्थापितांनी काय दिले? हाही प्रश्न अनुत्तरित राहतो. 'कारू नारूंचा अर्जदस्त' यामध्ये कारू नारूंनी नम्रपणे आपल्या व्यथा मांडून गाव सोडण्याची तयारी दर्शविली आहे. हे कारू-नारू कुणब्याला मदत करतो. त्याबदल्यात बलुतं घेणारी, पण ही बलुत्याची पद्धत बंद झाली. 'कारू नारू' या व्यवस्थेमुळे समाजात विषमता प्रस्थापित झाली. त्यामुळे ही व्यवस्था नाकारण्यासाठीचाच हा अर्जदस्त आहे. कुणब्यांबरोबर पिढ्यान्पिढ्या शेतीची सेवा केली. पण होणारे शोषण थांबले नाही. या आधुनिक काळामध्ये कारू-नारूंनाही सन्मानाची वागणूक मिळविण्याचा ते आग्रह करताना दिसतात. जुन्या गावाची रीत व सद्यःस्थितीची ग्रामस्थिती येथपर्यंतचा गावप्रवास या कवितांमधून उलगडत गेला आहे.

कुणब्याच्या जीवाची झडती चौथ्या विभागामध्ये पहायला मिळते. कुणबी कृषिव्यवस्थेचा केंद्रभाग, महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' मधील विचार प्रारंभी कवी उधृत करतात. अज्ञान हे कुणब्यांचे दुःखाचे, शोषणाचे मूळ आहे हे त्यांनी सांगितले. इतरांच्या आयुष्यात भाकरी वाटणारा, सुख वाटणारा कुणबी स्वःजीवनात कष्टमयी व दुःखी आहे. 'सांगता म्होरके' या कवितेत गावगुंडाच्या हाती गावाची सत्ता गेल्याने गावामध्ये बदल कसा झाला याचे चित्रण दिसते. इतरांना काम देऊन स्वतः मात्र बशा बैलासारखे जीवन जगणारे हे म्होरके. यांच्या घरातील बायका शेतामध्ये राबतात. पिकासाठी ठेवलेले पैसे जत्रेमध्ये उडवून देताना या म्होरक्यांना कुटुंबासह शेतीची काळजीही वाटत नाही. सोसायटी, पंचायत यामध्येही त्यांनी भ्रष्टाचार केला. पाण्याचा रखवालदार बनून पाणीही पळविले. यामुळे गावाची समृद्धी नष्ट झाली. 'कुणबाऊ आम्ही' या कवितेमधून कुणबी जीवनातील कष्ट मांडले. जन्मभर राबणे, कष्टणे हेच त्यांच्या नशिबी उरते. शेती कसूनही माणूस व निसर्ग दोघेही साथ देत नाहीत. दुष्काळामुळे कुणब्याचे कंबरडे मोडले. निघेल तेवढ्या उत्पन्नालाही चांगली किंमत मिळत नाही. कष्टी चढण त्याच्या वाटघाला असून त्याला सुख कधी मिळत नाही. शेती व माती याशिवाय आयुष्यात दुसरे काहीच नाही. कुणबी रीत जन्मभर सांभाळली. स्वतः कोंडा खाऊन इतरांना मांडे दिले. कुणबी जीवनाची दुर्दशा येथे दिसते. 'कशाचेच काही' या कवितेत जगण्यासाठी भटकंती, मजुरी करणाऱ्याचे चित्रण आहे.

सहकार व्यवस्थेमधील वास्तव चित्रण 'शेतकऱ्याच्या ठेवी बुडवणाऱ्या बँकेचा' या कवितेत येते. कुणब्याने विश्वासाने बँकेमध्ये ठेवी ठेवल्या. त्यातही भ्रष्टाचार झाला. कुणबी माणसेच कुणब्याला लुटायला बसले आहेत. त्यांच्या आयुष्याची ठेव बुडविली. कुणब्याने कमावलेले कणगीतील दाणेही दलालांनी लुटले. महात्मा फुल्यांच्या विचारांमध्ये जीवनविकासाचा सूर्य पाहणारी कुणबी पिढी एकेकाळी होती. पण त्या न्यायी राजाच्या पश्चात लुटमारीचा डाव सर्वांनी मांडला. आजवर किती योजना आल्या, परंतु त्या कागदावरच राहिल्या. कुणब्याला त्याचा काही फायदा झाला नाही. त्याने आयुष्यभर ऐपत कमाविली. नेकीने, इमानाने तो जगला. पण त्याला सर्वांनी लुबाडण्याचे काम केले. 'कृषी प्रदर्शनात अल्पभूधारक' या कवितेत अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानामधील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या दृष्टीने असलेला तकलादूपणा व्यक्त केला आहे. कृषिखात्याने कृषी प्रदर्शनासाठी शेतकरी नेले. तेथील चकचकीत स्टॉल, आधुनिक औजारे, नवे बियाणी, नवलाईची पीके हे सर्व पाहून ते हरखून गेले. पण सोपी शेती अधिकच अवघड झाल्याची त्यांची भावना झाली. रासायनिक शेतीमधील फोलपणा येथेही दिसतो. पॉलिहाऊस शेती कोणत्या शेतकऱ्याने करावी. ज्यांना राहण्यासाठी घर नाही अशा गरीब, अल्पभूधारक कुणबी पॉलीहाऊस बांधेल काय? दूध काढण्याचे यंत्र खरेदी करेल काय? हा खरा मूळ प्रश्न आहे. जो कुणबी दोन वेळच्या अन्नासाठी राब राब राबतो त्याला या आधुनिक शेत अवजारे घेऊन कशी परवडणार. अल्पभूधारक शेतकऱ्याला ट्रॅक्टर घेऊन काय फायदा? जरी फायदा मिळाला तर तो एवढ्या किंमतीचा ट्रॅक्टर (कर्षक) घेणार कसा हा सुद्धा न सुटणारा प्रश्न आहे. या कृषिप्रदर्शनात एका बाजूला शेती विषयावरचे कविसंमेलन चालू होते. त्यातील किती कवींना शेतीप्रश्नांची जाण असते हे पहाण्यासारखे आहे. हा कुणबी इतक्या गरिबीत जगतो आहे की, आरोग्याच्या त्याच्या

समस्या सुटल्या नाहीत. तो कधी माती परीक्षण करून ठिबक बसवून शेती कसणार. ही अपेक्षा त्याच्या संदर्भात ठार चुकीची ठरेल. अशा कृषिप्रदर्शनात फक्त भांडवलदार, बागायतदार लोकांचा विचार होतो. अल्पभूधारकांचा यामध्ये विचार केला जात नाही. या कवितेतून कुणब्याला भान मिळते. 'कास्तकरांना भान देणारी ही कविता आहे. हरितक्रांती, बहुजैविकता, बहुपिकपद्धती, रासायनिक खते, संकरित बियाणे, अनैसर्गिक शेतीप्रयोग याला भुलून शेतकऱ्याने स्वतः आपल्या शोषणाचा अध्याय मांडला आहे.' हे मत पटते. 'जेव्हा शेतीची पण फॅशन बनती' या कवितेमध्ये शेतीपद्धती कितीही बदलली तरी शेतकरी आर्थिक समृद्धी मिळवू शकला नाही हेच सत्य यात दिसते. एकेकाळी बेणं फेकून दिले की पिकच काढायला कुणबी जायचे. अर्धपोटी पण सुखात जगायचे. नंतर म्हणाले हायब्रिड पेरा. त्यातही बाजारभाव भेटला नाही. ऊस शेतीमुळे कुणब्यांपेक्षा कारखानदाऱ्यांचे भले झाले. भाजीपाल्यानेही तारले नाही. नंतर कोणी सांगितले जोडधंदे करा. संकरित गाई सांभाळून दुग्धव्यवसाय केला. कोंबडीपालन केले. निलगिरी लावली. त्यातूनही काही साध्य झाले नाही. फळबागातही उत्पन्नापेक्षा खर्चच जास्त झाला. अनेकविध शेतीचे प्रयोग कुणबी पिढ्यान्पिढ्या करतोय, परंतु अजूनही त्याच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक झाली आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. 'शेतकऱ्यांविरूद्ध आरोपपत्र' या कवितेत आत्मटीका दिसते. कुणबी जीवनाचे सिंहावलोकन यामध्ये केले आहे. प्राकृतिक व्यवस्था पूर्णतः मानवाने बिघडवली. निसर्गाच्या चक्राविरूद्ध कुणबी वर्तन करत गेला. सृजनाची शक्ती असणाऱ्या मातीमध्येही विष कालवले. कवी म्हणतात, *"हा तुझा सृजनाच्या मातीवरचा प्रयोग नाही बलात्कार आहे, बलात्कार..." (पिढीपेस्तर प्यादेमात, पृ.क्र. ६२)* तरीही जगाच्या भाकरीची सोय केली म्हणून कुणब्याला माफ केले. इतरांनीही अन्नदाता म्हणून गौरव केला. काहींनी उपजाऊ जमिनीवर डोळा ठेवून लुबाडण्याचे काम केले. शेवटी कुणबीही व्यवस्थेमध्ये लुटारूंबरोबर सामील झाला. आर्थिक लाभापायी निसर्गाच्या नैसर्गिक परंपरेला नख लावण्यात आला. कुणब्याने भुईला लुटले व इतरांनी कुणब्याला. प्राणी, वनस्पती यासह निसर्गालाही गुलाम बनविण्याची प्रक्रिया सुरू आहे. हजारो वर्षे राबूनही कुणबी जीवनाला सुख नाही. जमिनीच्या वंशावळीतून तुला आता बाहेर यायचे आहे, पण तीच तुझी सक्तमजुरी. कुणब्याच्या दुहेरी शोषणाचा आलेख येथे मांडला आहे. एक निसर्ग व दुसरे प्रस्थापित. निसर्गव्यवस्थेचा खून झाल्याने कुणबी जीवनही मरणासन्न बनले. यावर प्रस्थापितांनी मात्र आनंदाने लाईव्ह तमाशा बघितला. शेतकरी असणे हीच भावना दुःखाची मानणारी अशी व्यवस्था आज निर्माण झाली. 'नवी चळवळ आता कुणब्याची' या कवितेत कुणब्याची समूहभावना व नवी भूमिका प्रकट होते. तो स्वतःपुरता दाणा पिकवणार. जगाची पर्वा तो आता करणार नाही. स्वतः पुरतीच दूध निर्मिती, अन्न-धान्यनिर्मिती करण्याची त्याची भूमिका. जादा पिकवून ते विकण्याऐवजी पशुधन चांगले सांभाळावे. राबणाऱ्याला घासातला घास द्यावा नि हरामखोराला लाथा. भामटे, शेट, सावकार, दलाल, आडते यांना प्रत्युत्तर द्यावे. वामनरूपी शोषणकर्त्यांना पातळात घालण्याची वेळ आली आहे, अशी भूमिका कुणबी घेत आहे. नोकरशाहीनेही कुणब्याला लुबाडण्याचे धोरण आखले आहे. कुणबीपणाचे दुःख इतके आहे की, मी त्यांच्या दुःखाला पाहून पळून आलो अशी म्हणण्याची वेळ आली आहे. 'काळीतून मुक्ती घेतलेल्याची कहाणी', 'एक पत्र', 'बातमी' याकवितांमधून कुणबी जीवन सोडणारे व त्यांच्या मानसिक स्थितीचे वर्णन येते. शेती हा जुगार बनल्याचे चित्र आज दिसत आहे. यामुळे शेती विकून छोटा व्यवसाय करणाऱ्या मनोवृत्ती वाढीस लागल्या आहेत. एकूणच संतोष पवार यांनी 'पिढीपेस्तर प्यादेमात' या कवितेमधील चारही विभागातून कृषिसंस्कृतीची झडती अस्सलपणे घेतली आहे.

**५. निष्कर्ष:**

'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहात कृषी जीवनाचे अस्सल आणि वास्तव चित्रण येते. कृषी जीवनातील विविध समस्या यामध्ये प्रकट होतात. कौटुंबिक कलह, शेतकऱ्यांचे कष्ट, मजुरांच्या समस्या, गाव खेड्यातील चालीरीती, अज्ञान, अंधश्रद्धा, सहकार व्यवस्थेचा प्रभाव या सर्वांमुळे शेतकरी जीवनावरील झालेला

परिणाम यामध्ये चित्रित होतो. या काव्यसंग्रहाची भाषाशैली ग्रामीण असून यातील भाषा अस्सल व जिवंत वाटते. शेतकरी कुटुंबातील स्त्रीचे कष्ट यामध्ये चित्रित केले आहे. एकूणच शेतकऱ्यांच्या जीवनातील संघर्ष, अभावग्रस्तता, त्याचे कुणबीपण आणि गावातील त्याचा जीवनस्तर या सर्वांची मांडणी या काव्यसंग्रहात येते.

## ६. समारोप:

'पिढीपेस्तर प्यादेमात' हा केवळ एक काव्यसंग्रह नाही, तर तो एका शेतकरी समूहने भोगलेल्या वास्तवाचा दस्तऐवज आहे. या कवितांमधून आपणास एक अस्वस्थ करणारा, पण जागृतीकडे नेणारा सुर ऐकू येतो.समाजातील अन्याय, विषमता, शोषण, आणि व्यक्तीच्या अस्तित्वासाठीची झुंज या संग्रहातील मध्यवर्ती भावना आहेत. कवितांमधील भाषा सहज, पण ठाशीव असून ती वाचकाच्या मनात थेटपणे भिडते.

## ७. संदर्भग्रंथ:

१. पवार, संतोष पद्माकर, 'पिढीपेस्तर प्यादेमात', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २००८.
२. भोसले, द. ता., 'ग्रामीण साहित्यः एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्र. आ. १९८८.
३. लिंबाळे, शरणकुमार, 'साठोत्तरी मराठी वाङ्मयीन प्रवाह', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७.
४. यादव, आनंद, 'ग्रामसंस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. २०००.